## 1.0 प्रस्तावनाः

मुंबई ही महाराष्ट्राची राजधानी व भारताची आर्थिक राजधानी असून सर्वांत जास्त लोकसंख्या असलेले शहर आहे. मुंबईचा विकास हा औद्योगिक क्रांतीमुळे झाला आहे. उत्तम नैसर्गिक हवामान, कच्च्या मालाची मुबलकता आणि सुनियोजित बंदर यांची उपलब्धता असल्यामुळे कारखानदारी व्यवसाय इथे विकसित झाला.

स्वातंत्र्यानंतर आयात व्यवसाय आणि तंत्रज्ञान क्षेत्रात झपाट्याने प्रगती झाली. स्वाभाविक दृष्टीने मुंबईत कारखानी उद्योजकांना तसेच आयात निर्यातीला वाव मिळाला. वाणिज्य आणि दळणवळणाच्या औद्योगिकीकरणाने रोजगाराच्या संधी उपलब्ध होऊन स्थलांतरीत लोकसंख्येत वाढ झाली. 2011 जनगणनेनुसार आज मुंबईची लोकसंख्या 1,24,79,608 इतकी आहे. लवकरच वाढत्या लोकसंख्येमुळे मुंबईतील जमिनी कमी होऊन उपनगरे तयार होऊ लागली.

वाढत्या शहरीकरणाने अनियोजित प्रकल्पांना वाव मिळाला. पुढे अशी वेळ आली की बगिचे, मैदाने यासारख्या सामाजिक घडणीस पूरक अशा वास्तू लयाला गेल्या. जमिनीच्या कमतरतेमुळे मुंबईत घर हे मध्यमवर्गीयांसाठी स्वप्नच झाले आहे.

प्रस्तावित अडचणीला सोडविण्याकरिता महाराष्ट्र सरकार आणि मुंबई महानगरपालिकेने कायद्यामध्ये बदल करून पुनर्विकास योजना अस्तित्वात आणली. ज्यामुळे जास्तीत जास्त सुनियोजित घरांची निर्मिती होण्यास मदत होईल.

## 2.0 प्रकल्पाची ओळख

प्रकल्पाचे प्रायोजक मे. कल्पवृक्ष डेव्हलपर्स आहेत. हा प्रकल्प सी.एस.नं. 5/600, मलबार हिल, कंबाला हिल डिव्हिजन, ऑगस्ट क्रांती मार्ग, 'डी' वॉर्ड, मुंबई, राज्य-महाराष्ट्र येथे आहे. प्रकल्पाची जागा दक्षिण मुंबईत असून प्रकल्पाची जागा ही सीआरझेड ने प्रभावित झालेली आहे व ती सीआरझेड-2 या क्षेत्रात येते. ह्या प्रकल्पाला पर्यावरण आणि वनसंरक्षण मंत्रालयाने जारी केलेल्या किनारी नियंत्रण क्षेत्र अधिसूचनेनुसार सीआरझेड परवाना मिळणे आवश्यक आहे.

पूर्वी अस्तित्वात असलेली इमारत ही धोकादायक म्हणून घोषित करण्यात आली होती. सन 2010 मध्ये सी.सी. मिळाल्यानंतर प्रकल्प प्रायोजकाने आठ मजल्यापर्यंत निवासी इमारत विकसित केली आहे. आता प्रकल्प प्रायोजकाने अतिरिक्त मजले बांधण्याचे नियोजित केले आहे. त्यामुळे इमारतीला सद्यस्थितीत तळ + सात मजले (मेकॅनिकल पार्कींग) + सेवा मजला (सर्व्हिस फ्लोअर) + 1 ते 14 मजले (अप्पर फ्लोअर) आहेत.

### 2.1 प्रकल्पाची जागाः

प्रस्तावित प्रकल्प मुंबई महानगरपालिकेच्या वॉर्ड क्र. 'डी' मध्ये असून मंजूर विकास आराखड्यानुसार निवासी क्षेत्रात आहे.

प्रकल्पाच्या जागेपासून पश्चिम रेल्वे ही पूर्व दिशेला अवघ्या 1.5 किलोमीटर अंतरावर आहे. केम्स कॉर्नर फ्लायओव्हर प्रकल्पाच्या पूर्व दिशेला आहे. चौपाटी प्रकल्पाच्या जागेपासून 2.00 किलोमीटर अंतरावर आहे.

### 2.2 प्रकल्पाच्या जागेची रुपरेषाः

प्रकल्पाची जागा ही सपाट जमीन असून सदर प्लॉट सी.एस.क्र. 5/600, मलबार हिल, कंबाला हिल डिव्हिजन, ऑगस्ट क्रांती मार्ग, 'डी' वॉर्ड येथे आहे. प्रकल्पाच्या जागेवर पोहोचण्यासाठी ऑगस्ट क्रांती मार्गाच्या उत्तरेकडील बाजूने आणि एल. जगमोहनदास मार्गाच्या पश्चिमेकडील बाजूने पोहोचता येते. सदर प्रकल्प पुनर्विकास योजनेंतर्गत मान्यताप्राप्त आहे.

नियोजित प्रकल्पाच्या जागेचे क्षेत्रफळ 428.93 चौ. मी. आहे.

### 2.3 प्रकल्पाबद्दलची माहिती

| | |
|---|---|
| प्रकल्पाची पायाभूत मांडणी | **"नियोजित पुनर्विकास योजना"**<br>तळ + सात मजले (मेकॅनिकल पार्कींग) + सेवा मजला (सर्व्हिस फ्लोअर) + 1 ते 14 मजले (अप्पर फ्लोअर) |

| | |
|---|---|
| प्रकल्पाचे एकूण क्षेत्रफळ | भूखंडाचे एकूण क्षेत्रफळः 428.93 चौ.मी.<br>बिल्टअप क्षेत्रफळ (एफएसआय नुसार) - 1072.307 चौ.मी.<br>एकूण बांधकाम बिल्ट अप क्षेत्रफळ – 3545 चौ.मी. |
| वाहनतळ क्षेत्रफळ | चार चाकी – 24 |
| प्रकल्पाचे अंदाजे मूल्य | ` 10.47 कोटी |

## 2.4 बाग-बगिचा आणि वृक्षारोपण

प्रकल्प प्रायोजकांनी प्रस्तावित भूखंडावर आणि भूखंडाच्या भोवताली एकूण 5 झाडांची लागवड करण्याचे योजिले आहे.

## 2.5 इतर उपयुक्तता

### 2.5.1 पाणी वापराचे प्रमाणः

बांधकामाच्या वेळी एकूण पाण्याचा वापर 10-12 घनमीटर प्रतिदिन होणार असून टँकरमार्फत पाणी पुरवठा करण्यात येणार आहे.

बांधकाम पूर्ण झाल्यानंतर लागणारी पाण्याची आवश्यकता – 8 घनमीटर प्रतिदिन

### 2.5.2 निर्माण होणारे सांडपाणी

प्रकल्पा दरम्यान तयार होणारे एकूण सांडपाणी 5 घनमीटर प्रतिदिन असून ते महानगरपालिकेच्या Sewer Line मध्ये सोडले जाईल.

### 2.5.3 लागणारी विद्युतउर्जा

स्रोतः स्थानिक सरकारी कार्यालय

बांधकामादरम्यान लागणारी एकूण विद्युतउर्जा 50 KW असून 75 kVA चे विद्युत जनित्र बसविण्यात येईल.

| घटक | क्षमता |
|---|---|
| अधिकतम मागणी | 500 KW |
| विद्युत जनित्र | 150 kVA चे एक विद्युत जनित्र |

### 2.6 घनकचरा

**अ. बांधकामाच्या वेळी**

इमारत तोडल्यामुळे निर्माण झालेला कचरा याशिवाय खोदकामामुळे तयार झालेल्या कचऱ्याचे प्रमाण खालीलप्रमाणेः

सुका कचरा - 4 कि.ग्रॅ प्रतिदिन

ओला कचरा – 2 कि.ग्रॅ. प्रतिदिन

**आ. बांधकामानंतर (प्रत्यक्ष वापरतेवेळी)**

सुका कचरा - 13 कि.ग्रॅ प्रतिदिन

ओला कचरा – 5 कि.ग्रॅ. प्रतिदिन

घनकचऱ्याचे सुका व ओला कचरा असे वर्गीकरण करून महानगरपालिकेला सुपूर्द करण्यात येईल.

## 2.7 प्रकल्पातील एकूण लोकसंख्येचा भार

प्रकल्पातील एकूण लोकसंख्येचा भार नॅशनल बिल्डींग कोड-2005 (भाग 4, पृष्ठ क्र. 27) नुसार गणला जाईल. सविस्तर विवरण खालीलप्रमाणेः

| क्र. | इमारत | गाळे/दुकाने/ खाटा/घटक | लोकसंख्या | एकूण लोकसंख्या |
|---|---|---|---|---|
| 1 | सदनिका | 8 (सदनिका) | 5 व्यक्ती प्रति सदनिका | 40 |

## 2.8 वीजबचत उपाययोजना आणि अपारंपरिक ऊर्जास्रोत

- सौर उर्जेवर चालणारे दिवे पदपथांसाठी, बगिच्यांसाठी, कॉरिडॉरसाठी व संयुक्त जागांसाठी वापरण्यात येतील.
- सर्व दिवे सीएफएल चे वापरण्यात येतील ज्यांना कमी वीज लागते.

## 3.0 पर्यावरणीय सद्यस्थिती

## 3.1 भुस्थल पर्यावरण

प्रस्तावित प्रकल्प हा सी.एस.क्र. 5/600, मलबार हिल, कंबाला हिल डिव्हिजन, ऑगस्ट क्रांती मार्ग, 'डी' वॉर्ड, मुंबई येथे असेल. प्रकल्पाच्या आजूबाजूला काही व्यापारी संकुले, शैक्षणिक केंद्र, इस्पितळे, मनोरंजनात्मक केंद्र आहेत. सदर जागा सपाट भूपृष्ठाची आहे.

वार्षिक तापमान हे अधिकतम 38 डिग्री सेंटिग्रेट व न्यूनतम 11 डिग्री सेंटीग्रेट आहे. जास्तीत जास्त तापमान असलेली नोंद 43 डिग्री सेंटीग्रेट असून कमीत कमी तापमानाची नोंद 7.4 डिग्री सेंटीग्रेट 22 जानेवारी 1962 रोजी नोंदविण्यात आली आहे.

प्रकल्पाच्या जागेपासून सर्वांत जवळचे रेल्वेस्थानक म्हणजे पश्चिम रेल्वेचे ग्रँटरोड स्थानक हे होय. छत्रपती शिवाजी टर्मिनस विमानतळ हे सर्वांत जवळचे विमानतळ आहे.

## 3.2 भुस्थल पद्धतीः

सदर भूखंड रहिवासी विकास केंद्राजवळ स्थित आहे. भूखंड रहिवासी आणि वाणिज्यिक आस्थापनांनी वेढलेला आहे.

## 3.3 वायू पर्यावरण

नियोजित प्रकल्प ऑगस्ट क्रांती मार्ग येथे असून भोवतालच्या जागेचा वापर संमिश्र (निवासी / व्यापारी ) आहे. सदर भूखंडाच्या बाजूला ट्रॅफिकची सदैव रेलचेल जाणवते.

हवेच्या चाचण्यांचे निष्कर्ष खालील ठिकाणांकरिता पुढीलप्रमाणेः

| पडताळणीचे ठिकाण | प्रकल्पाचे ठिकाण |
|---|---|
| ठिकाण-1 | प्रकल्पाची जागा |
| ठिकाण-2 | माऊंट ब्लँक बिल्डींग जवळ |
| ठिकाण-3 | मधुसागर बिल्डींग जवळ |

## या भागातील हवेच्या चाचण्यांचे निष्कर्ष पुढीलप्रमाणे

### तक्ता अः नियोजित प्रकल्पाच्या परिसरातील हवेतील प्रदूषकांचे सरासरी प्रमाण

### कालावधीः 1 जानेवारी 2012 ते 31 मार्च 2012

| पडताळणीचे ठिकाण | RSPM µg/m$^3$ | $SO_2$ µg/m$^3$ | NOx µg/m$^3$ |
|---|---|---|---|
| ठिकाण-1 | 109 | 11 | 32 |
| ठिकाण-2 | 86 | 09 | 14 |
| ठिकाण-3 | 55 | 08 | 24 |

µg/m$^3$ मध्ये दिलेले प्रमाण हे 24 तासांच्या पाहणीची सरासरी आहे.

### तक्ता बः राष्ट्रीय हवेच्या गुणवत्तेचा दर्जा ( NAAQ Standards)

| क्र. | प्रदूषणकारी घटक | Time Weighted Average | National Ambient Air Quality Standards G.S.R. 826 (E), MoEF Notification dated 18th November 2009 | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | औद्योगिक/संमिश्र वापर µg/m$^3$ | घरगुती/ग्रामीण भाग µg/m$^3$ | संवेदनाक्षम भाग µg/m$^3$ |
| 1 | $SO_2$ | 24 तास | 80 | 80 | 80 |
| 2 | NOx | 24 तास | 80 | 80 | 80 |
| 3 | RSPM 10 | 24 तास | 100 | 100 | 100 |

### तक्ता कः

### सरासरी/कमाल आणि किमान हवामान विषयक माहिती

### कालावधीः 1 ऑक्टोबर 2011 ते 31 डिसेंबर 2011

| कालावधी | तापमान ($^0$C) | | वाऱ्याची दिशा | सरासरी वाऱ्याचा वेग (km/hr) | | | सरासरी आर्द्रता (%) | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | अधि. | न्यून | | अधि | न्यून | सरा. | अधि. | न्यून |
| ऑक्टोबर 2011 | 37.0 | 20.0 | NNW | 16.0 | 0.0 | 5.0 | 96 | 20 |
| नोव्हेंबर 2011 | 37.0 | 18.0 | NNW | 18.0 | 0.0 | 5.0 | 91 | 21 |
| डिसेंबर 2011 | 36.0 | 12.0 | NNW | 14.0 | 0.0 | 4.0 | 98 | 17 |

स्रोतः Indian Meteorological Department

## 3.4 ध्वनी प्रदूषणाची पातळी

प्रस्तावित प्रकल्पाच्या व भोवतालच्या जागेच्या ध्वनीप्रदूषणाची पातळी पुढीलप्रमाणे आहेः

**तक्ता क्र. ङः**

**नियोजित प्रकल्पाच्या सभोवतालच्या जागेतील ध्वनी प्रदूषणाची पातळी**

**कालावधीः 1 जानेवारी 2012 ते 31 मार्च 2012**

| पडताळणीचे ठिकाण | प्रकल्पाचे नाव | दिवसा (dBA) | रात्री (dBA) |
|---|---|---|---|
| ठिकाण-1 | प्रकल्पाची जागा | 59.3 | 48.5 |
| ठिकाण-2 | माऊंट ब्लँक बिल्डींग जवळ | 63.5 | 51.2 |
| ठिकाण-3 | मधुसागर बिल्डींग जवळ | 62.4 | 52.5 |

सदर तक्त्यावरून असे आढळून येते की, केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाने ठरवून दिलेल्या प्रमाणापेक्षा नियोजित प्रकल्पाच्या सभोवतालच्या सर्व ठिकाणची ध्वनी प्रदूषणाची पातळी जास्त आहे.

## 3.5 मृदा पर्यावरण

बांधकामादरम्यान संमिश्र स्वरूपाची बांधकाम पद्धती अवलंबण्यात येईल ज्यामुळे प्रकल्पाच्या मृदावर येणारा ताण कमी होईल. आरएमसीमुळे दळणवळण कमी होऊन भूस्थल पर्यावरणाला हानी पोहोचणार नाही.

प्रत्यक्ष वापरतेवेळी सुनियोजित बगिचा आणि झाडांची लागवड भूस्थल पर्यावरणाला प्रभावित करेल. काळजी घेतल्यामुळे मृदा पर्यावरण व आजूबाजूला कोणत्याही प्रकारचा लक्षणीय परिणाम होणार नाही.

पर्यावरणाच्या या अवलंबिलेल्या पद्धतीमुळे मृदेची प्रत तशीच राहण्यास मदत होईल.

## 3.6 जल पर्यावरण

भूपृष्ठावरून वाहणारा पाण्याचा स्रोत या ठिकाणी अस्तित्वात नाही.

## 3.7 जैविक पर्यावरण

प्रकल्पाच्या जागेवर व आजूबाजूला पाम, जांभूळ, नारळ, भेंडी, बदाम, आंबा, सुपारी, बोर, वड इत्यादी झाडे आहेत. झाडांची लागवड व त्यांची देखरेख वैयक्तिकरित्या किंवा बृहन्मुंबई महानगरपालिके मार्फत पाहिली जाते.

या परिसरात प्रामुख्याने आढळून येणारे पक्षी म्हणजे बुलबुल, मैना, कावळा, कबुतर, चिमणी, घुबड, आणि पोपट हे होय.

वीर जिजामाता उद्यान प्रकल्पाच्या ठिकाणापासून 3 कि.मी. अंतरावर आहे. वनस्पतीशास्त्रात महत्व असणारी सावली देणारी बरीचशी झाडे या ठिकाणी आहेत. सदर उद्यानामध्ये 150 प्रजातींची एकूण 1800 झाडे आढळतात. जिजामाता उद्यानामध्ये विविधतेने संपूर्ण एक नर्सरी देखील आहे.

याव्यतिरिक्त वीर जिजामाता उद्यानामध्ये सुमारे 8 हेक्टर क्षेत्रफळाचे प्राणीसंग्रहालय असून यामध्ये सरपटणारे प्राणी, पक्षी, सस्तन प्राणी यांच्या 1200 प्रजाती आढळून येतात. सर्प उद्यानामध्ये सुमारे 200 च्या वर सर्प आहेत. प्राणी संग्रहालयामध्ये सिंह, वाघ, अस्वल, चित्ते, माकड, हरिण, गेंडा आणि हत्ती इ. विविध प्राणी आढळून येतात. **(स्रोतः ग्रेटर मुंबई गॅझेटियर)**

प्रकल्पाच्या जागेवर 5 स्थानिक झाडे नव्याने लावण्यात येतील.

## 4.0 पर्यावरणावरील परिणाम व नियोजन

### 4.1 भूस्थल पर्यावरण

प्रकल्पाची रचना अशी केली आहे की त्यामुळे स्थानिक परिसराची शोभा वाढेल. प्रकल्पाचे बांधकाम अशा प्रकारे केले जाईल ज्यायोगे ते प्रेक्षणीय बनेल. प्रकल्प प्रायोजकांनी सदर प्रकल्पामध्ये बरीच मोकळी जागा राखून ठेवली आहे. सदर प्रकल्पाच्या रचनेमुळे प्रकल्पाचे वास्तुशास्त्रविषयक मूल्य आपोआपच उंचावले जाईल.

#### 4.1.1 घनकचरा

**बांधकामादरम्यानः**

सदर प्रकल्पाच्या ठिकाणी इमारत होती ती तोडण्यात आली आहे. त्यामळे निर्माण झालेल्या कचऱ्याची अधिकृत कंत्राटदारामार्फत (महानगरपालिकेची परवानगी घेऊन) विल्हेवाट लावण्यात आली. प्रकल्पस्थळावर काम करण्याऱ्या कर्मचाऱ्यांमार्फत तयार होणाऱ्या कचऱ्याचे वर्गीकरण करून त्याची देखील विल्हेवाट लावण्यात आली.

**बांधकामानंतर (प्रत्यक्ष वापरतेवेळी)**

बांधकामानंतर दररोज 18 कि.ग्रॅ. घनकचरा तयार होईल. प्रकल्प प्रायोजकाने ओला व सुका कचरा असे वर्गीकरण करण्याचे योजिले असून सदर कचरा महानगरपालिकेला सुपूर्द करण्यात येईल.

### 4.2 वायू पर्यावरण

**बांधकामाच्या वेळीः**

बांधकाम चालू असताना हवेतील तरंगणाऱ्या घनकणांची (धुलिकण) पातळी थोड्या प्रमाणात वाढेल. तयार कॉंक्रिट बाहेरून मागवले जाईल. बांधकाम चालू असताना खाली दिलेल्या मुद्यांबाबत काळजी घेण्यात येईल.

तयार काँक्रिट पुरविण्यात येईल त्यामुळे ट्रकच्या फेऱ्या कमी होतील. सिमेंट, खडी, व वाळूने भरलेली वाहने बांधकामाच्या जागेपर्यंत आणावी लागतील व त्यामुळे हवेतील धुळीचे प्रमाण वाढेल. अशा मालावर आवरणे घातली जातील. जमिनीवर व नवीन बांधकामावर नियमितपणे पाण्याचा शिडकावा करण्यात येईल. धुळीकणांचे हवेतील उत्सर्जन कमी होईल.

**बांधकामाच्या नंतरः**

बांधकाम पूर्ण झाल्यानंतर वायू पर्यावरणावर कोणताही परिणाम जाणवणार नाही. गाड्यांच्या ट्रॅफिकला आळा घालण्यासाठी प्रकल्प प्रायोजक मुबलक प्रमाणात कार पार्कींगची व्यवस्था करणार आहे.

**4.3 ध्वनी पर्यावरण**

**बांधकामाच्या वेळीः**

बांधकामासाठी वापरल्या जाणाऱ्या क्रेन, काँक्रीट मिक्सर, इत्यादी यंत्रसामग्री तसेच मालांची ने-आण करणारे ट्रक यामुळे आवाजाची पातळी वाढण्याची शक्यता आहे. परंतु हा परिणाम तात्पुरत्या कालावधीसाठी असेल. यासाठी खाली दिल्याप्रमाणे प्रतिबंधक योजना करण्यात येईल.

- रात्रीच्या वेळी ध्वनी प्रदूषणकारी काम केले जाणार नाही.
- आवाज करणाऱ्या यंत्राजवळ काम करणाऱ्या कामगारास कानावर आवाजाचे नियंत्रण करणारी उपकरणे उदा. इयर प्लग वगैरेचा वापर केला जाईल.
- यंत्रसामुग्री व वाहने यांची वेळोवेळी देखरेख व आवाज कमी करण्यासाठी ध्वनी नियंत्रक आच्छादने घातली जातील.
- बांधकामाच्या दरम्यान विविध झाडांची रोपण करण्यात येईल ज्यामुळे ध्वनी नियंत्रित केला जाईल.

**बांधकामाच्या नंतरः**

बांधकाम पूर्ण झाल्यावर वाहनांची ये-जा सोडता ध्वनी प्रदूषण होण्याचे काहीही कारण नाही. प्रकल्पामध्ये वाहने उभी करण्यासाठी योग्य सोय करण्यात आली आहे. तसेच यातायातीचे सुयोग्य नियमन केले जाईल. यामुळे वाहनांच्या आवाजावर नियंत्रण राहील. तसेच हमरस्त्याच्या आणि आतील बाजूस लावण्यात येणाऱ्या झाडांमुळे रस्त्याकडून येणारा आवाज कमी होईल.

**4.4 जल पर्यावरण**

**बांधकामाच्या वेळीः**

नियोजित प्रकल्पाच्या बांधकामाच्या वेळी प्रतिदिन 10-12 घनमीटर पाणी लागेल. ते टँकरद्वारे पुरविण्यात येईल.

**बांधकामाच्या नंतरः**

बांधकामाच्या पूर्णतेनंर इमारतीच्या प्रत्यक्ष वापरावेळी एकूण 8 घनमीटर प्रतिदिन पाणी लागेल. सदर पाण्याचा पुरवठा महानगरपालिकेमार्फत केला जाईल. प्रकल्प प्रायोजकाने रेनवॉटर हार्वेस्टींग पद्धती अवलंबिण्याचे ठरविले असून त्यामुळे 10,000 लीटर पाण्याची बचत होईल.

**4.5 जैविक पर्यावरण**

प्रकल्पाच्या जागेवर एकूण अंदाजे 5 नवीन झाडांचे रोपण केले जाईल तसेच सुनियोजित मोकळी जागा आणि जास्त हरित पट्टा यामुळे पर्यावरणाची शोभा वाढेल.

**4.6 सामाजिक पर्यावरण**

या ठिकाणी जीर्ण अवस्थेत असलेली इमारत पाडण्यात आली असून या ठिकाणी एक नवीन इमारत बांधण्यात आली आहे. या ठिकाणी अंदाजे 40 व्यक्तींचा रहिवास असेल. सर्व सुखसुविधा असलेला व सुनियोजित असा हा प्रकल्प आहे. शाळा, कॉलेजेस, इस्पितळे, मोकळी जागा, बाजार इ. सुविधा हाकेच्या अंतरावर उपलब्ध आहेत.

सदर प्रकल्पामुळे बांधकामादरम्यान कुशल व निमकुशल कामगारांकरिता रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील. तसेच प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर देखील शिपाई, सुरक्षारक्षक, झाडूवाले, रखवालदार यांसाठी रोजगाराच्या अनेक संधी उपलब्ध होतील.

सदर प्रकल्प हा सामाजिक पर्यावरणाच्या दृष्टीने पुरक असून प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर रेनवॉटर हार्वेस्टींग, हरित पट्टा, अतिरिक्त वृक्ष लागवड तसेच इतर सोयीसुविधा असलेला उत्तम प्रकल्प म्हणून नावाजला जाईल.

## 5.0 आपत्कालीन व्यवस्थापन योजना आणि सर्वसाधारण सुरक्षिततेची व्यवस्था

बृहन्मुंबई महानगरपालिकेचे नेमून दिलेले सुरक्षिततेचे सर्व कायद्यांचे प्रकल्प प्रायोजक पालन करू इच्छितात.

### 5.1 अग्निशमन आणि सुरक्षितता

या इमारतीसाठी लागणारी अग्निशमन व्यवस्था व इतर आपत्कालीन सुरक्षा व्यवस्था महापालिकेच्या अग्निशमन विभागाने नेमून दिलेल्या निर्देशनानुसार असेल. त्याची सविस्तर माहिती पुढीलप्रमाणेः

1. कुठेही नेता येतील असे फायर एक्स्टींग्युशरची व्यवस्था असेल
2. मुबलक पाणीपुरवठा असलेल्या भूमिगत व ओव्हरहेड टँकचा वापर
3. वेट रायजर्स पद्धती
4. इंटर कम्युनिकेशन पद्धतीचा वापर

### 5.2 भूकंपविषयक पर्यावरण आणि घ्यावयाची काळजी

भारत सरकारने प्रकाशित केलेल्या भूकंप पर्यावरण विभागाच्या नकाशानुसार मुंबई शहर हे झोन-3 च्या अंतर्गत येते. भूकंपरोधन क्षमता आणि वाऱ्याचा वेग वगैरेचा विचार करून या प्रकल्पाचा आराखडा आय.एस. कोडप्रमाणे बांधकाम दृष्ट्या सुरक्षित, दृढ आणि अचल असा बनविण्यात येईल.

## 6.0 पर्यावरण व्यवस्थापन कृती आराखडा

सदर प्रकल्पाच्या बांधकामादरम्यान आणि बांधकाम पूर्ण झाल्यानंतर निर्माण होणारे पर्यावरणीय परिणाम कमी करण्यासाठी विविध उपाय पर्यावरण व्यवस्थापन कृती आराखड्यामध्ये सुचविले आहेत. यामध्ये पर्यावरणीय देखरेख आराखड्यांतर्गत विविध पर्यावरणीय कायद्यांचे चित्रही रेखाटले आहे. या पर्यावरण व्यवस्थापन कृती आराखड्यामध्ये आणीबाणीचे प्रसंग उदा. अपघात, आग इत्यादी संदर्भात कोणती पावले उचलावीत याचे सविस्तर विवरण आहे.

# <u>निष्कर्ष</u>

प्रकल्प प्रायोजक आणि विकासक मे. कल्पवृक्ष डेव्हलपर्स एकंदरितच सुरक्षिततेचे उपाय, स्वच्छ परिसर  आणि चांगले पर्यावरण याबाबत जागृत दिसतात.

सारांशाने खालीलप्रमाणे असे म्हणता येईलः

- नियोजित पुनर्विकास प्रकल्पांतर्गत तयार होणारा सदर प्रकल्प ऑगस्ट क्रांती मार्ग, मुंबई येथे आहे.
- प्रायोजक बृहन्मुंबई महानगरपालिकेने आणि अग्निशमन दलाने घालून दिलेले सुरक्षिततेचे सर्व कायद्यांचे पालन करू इच्छितात.
- प्रकल्पाचे बांधकाम हे भूकंपरोधक-3 च्या आवश्यकतेनुसार बनविण्यात येणार आहे.
- या प्रकल्पात पर्जन्य जलसंचयाची सुविधा असेल.
- प्रकल्पाच्या जागेभोवतालची हवेची गुणवत्ता राष्ट्रीय हवेच्या गुणवत्ता दर्जानुसार योग्य अशी असेल.
- घनकचऱ्यापैकी ओला व सुका कचरा वेगळा केला जाईल व महानगरपालिकेच्या हवाली केला जाईल.
- ध्वनी प्रदूषणाची पातळी बांधकाम चालू असताना वाढण्याची शक्यता आहे. प्रकल्प कार्यान्वित झाल्यावर ध्वनीची पातळी केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या नेमून दिलेल्या मर्यादेखाली असेल.
- सर्वसाधारण वनस्पती आणि प्राणी यांवर कुठलाही विशेष परिणाम दिसून येणार नाही.
- प्रकल्पामुळे बांधतेवेळी तसेच प्रकल्प पूर्णतेनंतर रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील. सदर प्रकल्पामुळे स्थानिक लोकांचे जीवनमान उंचावण्यास मदत होईल. त्यामुळे सदर प्रकल्प सामाजिक पर्यावरणास पुरक आहे असे म्हणता येईल.

या प्रकल्पामुळे कोणत्याही प्रकारचा नकार्थी परिणाम या ठिकाणी होणार नाही.